// सा विद्या या विमुक्तये //
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६ (महाराष्ट्र)
**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**
**"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)**
Establishment on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

## ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phone : (02462) 229242/43
Fax : (02462) 229245 / 229325
Website : srtmun.ac.in
e-mail :- affiliation@srtmun.ac.in

**शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता विविध अभ्यासक्रमांना अतिरिक्त प्रवेश वाढ देणे बाबत.**

## :: तातडीचे परिपत्रक ::

**संदर्भ :– मा. अधिष्ठाता मंडळ बैठक कं. ६३ विषय कं. २/६३–२०२४, दि. २२.०६.२०२४.**

प्रस्तूत विद्यापीठाशी संलग्नीत सर्व पारंपारीक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे प्राचार्य यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता विविध अभ्यासक्रमांना अतिरिक्त प्रवेश वाढ प्रदान करणे बाबत दि. २२/०६/२०२४ रोजी संपन्न झालेल्या मा. अधिष्ठाता मंडळ बैठक कं. ६३ विषय कं. २/६३–२०२४ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत झालेला आहे.

१. विद्यार्थ्यांची अतिरिक्त प्रवेशवाढीची संख्या ही प्रत्येक तुकडीसाठी असेल.
२. अतिरिक्त प्रवेश वाढ देत असतांना संबधित शहरातील इतर महाविद्यालयांच्या प्रवेशावर परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी.
३. अतिरिक्त प्रवेश वाढ देत असतांना संबधित महाविद्यालयाचे नॅक झालेले असणे आवश्यक आहे. पुर्णवेळ प्राचार्यांची नेमणुक झालेली असावी तसेच पदवी वर्गासाठी विद्यापीठ मान्य शिक्षक तसेच पदव्यत्तर वर्गासाठी स्वतंत्र शिक्षक (कोअर टिचर) ची नेमणुक आवश्यक आहे. या सर्व बाबींची पुर्तता होत असेल तर विद्यापीठाने निश्चित केलेले शुल्क आकारुन अतिरिक्त प्रवेश वाढीस परवानगी देण्यात येईल.
४. महाविद्यालयातील शिक्षकांनी मुल्यांकन प्रक्रियेमध्ये भाग घेतल्याची माहिती सादर करणे आवश्यक आहे.
५. वरील अटींची (०३ व ०४) पुर्तता करणा–या महाविद्यालयांसाठी प्रवेश वाढ देण्यात येणार आहे.
   अ) शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करीता ज्या अभ्यासक्रमांच्या तुकडीची प्रवेश क्षमता १२० आहे त्या अभ्यासक्रमास १५ टक्के वाढीव प्रवेश देण्यात यावेत. कोणत्याही परिस्थीतीत एका तुकडीमध्ये १४० पेक्षा अधिक विद्यार्थी संख्या होणार नाही याची दक्षता घ्यावी.
   ब) ज्या अभ्यासक्रमांच्या तुकडीची प्रवेश क्षमता १०० किंवा कमी आहे त्या अभ्यासक्रमास २० टक्के वाढ करण्यात यावी.
   क) पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची मागणी आणि परिसरातील महाविद्यालयातील प्रवेश स्थिती पाहून २० टक्क्यापर्यंत अतिरिक्त प्रवेशवाढ देण्यात यावी.

वरील ठरावाच्या अनुषंगाने अतिरिक्त प्रवेशवाढीची मागणी करणा–या महाविद्यालयांनी प्रस्ताव दि. ३१/०७/२०२४ पर्यंत सादर करण्यात यावा जेणे करुन अतिरिक्त प्रवेशवाढी बाबत पुढील कार्यवाही करता येईल याची नोंद घ्यावी. यानंतर सादर करण्यात येणा–या प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

सदर परिपत्रक हे विद्यापीठाच्या www.srtmu.ac.in या संकेतस्थळावर affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात येत आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर,
विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०२४–२०२५/118
दिनांक :– ०३/०७/२०२४

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग

प्रत :–

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत पारंपारीक महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर Affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.